जिल्हा परिषद/पंचायत समिती व ग्रामपंचायत सार्वत्रिक/पोट निवडणुकांसाठी अनुदान वितरणाचे निकष ठरविणेबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१

शासन शुद्धिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५६/ई-९३४६२४/पं.रा.२

दिनांक : १८/११/२०२६

वाचा :

१. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र: संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५६/ई-९३४६२४/पं.रा.२, दिनांक २९.०९.२०२५

२. राज्य निवडणूक आयोगाचे क्र:रानिआ/जिपपंस/२०२३/प्र.क्र.७/का.७, दिनांक ०५.०२.२०२६.

३. विभागाचे राज्य निवडणूक आयोगास लिहिलेले समक्रमांकाचे दिनांक १७.०८.२०२६ चे पत्र.

४. राज्य निवडणूक आयोगाचे क्र:रानिआ-२०२६/जिपपंस/प्र.क्र.३५/का.०७, दिनांक ११.०९.२०२६

प्रस्तावना :

जिल्हा परिषद/पंचायत समिती व ग्रामपंचायत या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोट निवडणूकांसाठी अनुदान वितरणाचे निकष निश्चित करण्याबाबत उक्त वाचा येथील दिनांक २९.०९.२०२५ च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद/पंचायत समिती निवडणुकांसाठी १००० ते १२०० मतदार संख्येच्या प्रति मतदान केंद्रास रुपये ७२,०००/- व ग्रामपंचायत निवडणूकांसाठी ८०० ते १००० मतदार संख्येच्या प्रति मतदान केंद्रास रुपये ३१,२५०/- इतके अनुदान अनुज्ञेय करण्यात आले आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीसाठी मतदान केंद्रांची संख्या निश्चित करण्यासाठी मतदाराला २ कि.मी. पेक्षा जास्त प्रवास करावा लागू नये, ग्रामपंचायतीच्या प्रत्येक प्रभागात किमान १ मतदान केंद्र ठेवणे, दुर्गम/डोंगराळ भागात विखुरलेल्या लोकवस्त्या असलेल्या ठिकाणी आवश्यकतेनुसार २ कि.मी. ची मर्यादा शिथील करणे, मतदान केंद्र हे मतदाराच्या शक्य तितक्या जवळ असावे व मतदाराला मतदान केंद्रात पोहोचण्यासाठी जास्त कष्ट करावे लागू नये इ. बाबी विचारात घेऊन मतदान केंद्रांची निर्मिती केली जाते. तसेच मतदान केंद्र स्थापन करण्यासाठी मतदारसंख्येचा विचार न करता EVM, Power Pack,

मतदान साहित्य, मतदान अधिकारी/कर्मचारी, वाहन व्यवस्था व कर्मचारी भत्ते इत्यादी बाबींवर निश्चित स्वरूपाचा खर्च करावा लागतो. त्यामुळे अनुदानाची परिगणना करताना केवळ मतदारसंख्या विचारात न घेता मतदान केंद्रनिहाय होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्च विचारात घेणे आवश्यक असल्याचे आयोगाने कळविले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या वरील मार्गदर्शक सूचनेस अनुसरुन दिनांक २९.०९.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील मतदान केंद्रासाठी विहित केलेली मतदारसंख्येची अट शिथील करून प्रति मतदान केंद्र निश्चित केलेल्या दराने अनुदान अनुज्ञेय करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती..

शासन शुद्धिपत्रक

उक्त वाचा येथील क्रमांक १ येथील शासन निर्णयातील परिच्छेद १ मधील विवरणपत्र (अ) व (ब) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

(अ) जिल्हा परिषद/पंचायत समिती सार्वत्रिक/पोट निवडणूकांकरिता अनुज्ञेय अनुदान

अ. क्र.	स्थानिक स्वराज्य संस्थाचे नाव	प्रभाग पद्धती	एका मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांची कमाल संख्या	प्रति मतदान केंद्र उपलब्ध करुन देण्यात येणारे अनुदान (रक्कम रुपयांमध्ये)
१	जिल्हा परिषद/ पंचायत समिती	एकत्र निवडणूक स्वतंत्र निवडणूक	१००० ते १२००	७२,०००/-

“ऐवजी”

अ. क्र.	स्थानिक स्वराज्य संस्थाचे नाव	प्रभाग पद्धती	एका मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांची कमाल संख्या	प्रति मतदान केंद्र उपलब्ध करुन देण्यात येणारे अनुदान (रक्कम रुपयांमध्ये)
१	जिल्हा परिषद /पंचायत समिती	एकत्र निवडणूक स्वतंत्र निवडणूक	संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत निवडणूकीसाठी मतदान केंद्रे स्थापित करणेबाबतचा निर्णय घेताना राज्य निवडणूक आयोगाचे निकष/निर्देश विचारात घेऊन उचित ठिकाणी मतदान केंद्राची	७२,०००/-

			स्थापना करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, या अटीच्या अधीन राहून मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांची संख्या.	

"असे वाचावे"

(ब) ग्रामपंचायत सार्वत्रिक/पोट निवडणूकांकरिता अनुज्ञेय अनुदान

अ. क्र.	स्थानिक स्वराज्य संस्थाचे नाव	प्रभाग पद्धती	एका मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांची कमाल संख्या	प्रति मतदान केंद्र उपलब्ध करुन देण्यात येणारे अनुदान (रक्कम रुपयांमध्ये)
१	ग्रामपंचायत	बहु सदस्यीय	८०० ते १०००	३१,२५०/-
		बहु सदस्यीय (थेट सरपंचासह)		

"ऐवजी"

अ. क्र.	स्थानिक स्वराज्य संस्थाचे नाव	प्रभाग पद्धती	एका मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांची कमाल संख्या	प्रति मतदान केंद्र उपलब्ध करुन देण्यात येणारे अनुदान (रक्कम रुपयांमध्ये)
१	ग्रामपंचायत	बहु सदस्यीय	संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत निवडणूकीसाठी मतदान केंद्रे स्थापित करणेबाबतचा निर्णय घेताना राज्य निवडणूक आयोगाचे निकष/निर्देश विचारात घेऊन उचित ठिकाणी मतदान केंद्राची स्थापना करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, या अटीच्या अधीन राहून मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांची संख्या.	३१,२५०/-
		बहु सदस्यीय (थेट सरपंचासह)		

"असे वाचावे"

२. मतदान केंद्रांची संख्या व त्यानुसार अनुज्ञेय अनुदानाची परिगणना ही प्रत्यक्ष स्थापित केलेल्या मतदान केंद्रांची संख्या विचारात घेऊन करण्यात यावी.

३. दिनांक २९.०९.२०२५ च्या शासन निर्णयातील मतदान केंद्रासाठी विहित केलेली मतदारसंख्येची अट शिथील करण्यात येत आहे. अन्य सर्व अटी व शर्ती कायम राहतील.

४. सदर शासन शुद्धिपत्रक वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५३३/व्यय-१५, दिनांक ७ ऑगष्ट, २०२६ अन्वये त्या विभागाने दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदरहू शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा संगणक संकेतांक 202611181207488520 असा आहे. हे शुद्धिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BABURAO MAHADU ASOLE

Digitally signed by BABURAO MAHADU ASOLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Rural Development Dept, 2.5.4.20=DD67F0D38C29AE85F8559E65D2F9D423F04FABB3383AF844CC7C057D58B4167A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EEFD6CD19B53F91B65DAD89AA72A32B839329DB6184B40A0F533230BD96705E, cn=BABURAO MAHADU ASOLE
Date: 2026.11.18 13:24:18 +05'30'

(बा. म. आसोले)

अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव.
४. मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव.
५. मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
९. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
११. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर
१२. सर्व विभागीय आयुक्त.
१३. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

१४.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

१५.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई (दोन प्रती)

१६.वित्त विभाग (व्यय-१५), मंत्रालय, मुंबई.

१७.ग्राम विकास विभाग, कार्यासन क्रमांक वित्त-१, वित्त-७

१८.कार्यासन पंचायत राज-२ (निवडनस्ती)